Chapter - 2



प्रकरण दुसरे

प्रकरण. २ रे

## प्राचीन वाङ्मयातील आत्मचरित्रपर उल्लेख.

आतापर्यंत आपण आत्मचरित्र म्हणजे काय, उत्कृष्ट आत्मचरित्र कोणास म्हणावें आणि कोणास म्हणू नये, यासाठी लेखकाने कायकाय खबरदारी घ्यावी इत्यादि अनेक गोष्टी बारकाईने पाहिल्या. आता या प्रकरणात प्राचीन संस्कृत व मराठी वाङ्मयात आत्मचरित्रपर उल्लेख कोठेकोठे आलेले आहेत त्याचें विहंगमावलोकन करूया. तसें पाहिलें तर ज्याला आपण आधुनिक भाषेत आत्मचरित्र म्हणून म्हणतो तसें आत्मचरित्र जवळ जवळ नाहीच असें म्हटलें तरी चालेल. संबंध संतवाङ्मयात तुकाराम महाराजांचे आत्मवर्णनात्मक अभंग सोडले तर स्वतः विषयी फारच थोडी माहिती या संतांनी सांगितलेली आहे. याच कारणामुळे प्राचीन मराठी वाङ्मयात एकाद्या व्यक्तीच्या जीवनाविषयी साधार आणि सूक्ष्म माहिती जेवढी मिळावयास पाहिजे तेवढी मिळत नाही. यास्तव एखाद्या संताचा आत्मवर्णनपर उल्लेख नुसता एकदोन ओळीतच असला तरी तो वाचकांच्या ध्यानात यावा म्हणून त्याच्या अनुषंगाने थोडीशी इतर माहितीही सांगण्यात आली आहे.

या प्रबंधाची मर्यादा आत्मचरित्रापुरतीच आहे हें खरें आहे. परंतु अगदी निकट सहवासातील व्यक्तीने सांगितलेल्या आठवणी या साधार आणि विश्वसनीय असल्याने त्यांना आपण आत्मचरित्रांत स्थान दिलें आहे. म्हणूनच अगदी थोडक्यात ज्ञानेश्वर महाराज, नामदेव महाराज, एकनाथ महाराज आणि रामदासस्वामी यांच्या आत्मचरित्रपर माहितीचा थोडासा उल्लेख पुढे केलेला आहे. संत बहिणाबाई यांनी आत्मचरित्रपर असा उल्लेख बराचसा

केला असल्याने ती माहितीही पुढे दिलेली आहे. तुकाराम महाराजांचे अभंग हेच त्यांचे आत्मचरित्र असल्याने त्यांच्या जीवनाविषयी पुष्कळच माहिती देता येण्यासारखी आहे. परंतु तेवढी येथे देता आली नाही. या शिवाय प्राचीन वाङ्मयात आत्मचरित्रपर आणखीही उल्लेख नाहीतच असें नाही. परंतु त्यांचा येथे समावेश केला नाही.

अशा तऱ्हेनें प्राचीन वाङ्मयातून जे आत्मचरित्रपर उल्लेख येथे दिले आहेत त्या विषयी आणि त्या अनुषंगाने आलेल्या इतर माहिती विषयी अधिक खुलासा या संतांच्या आत्मचरित्र वर्णनानंतर याच प्रकरणात केलेला आहे. आता प्रथम संस्कृत वाङ्मयात आढळणारा आत्मचरित्रपर उल्लेख प्रथम पाहू या.

१

## श्रीकृष्णाचा आत्मचरित्रपर उल्लेख.

श्रीकृष्णाच्या आत्मचरित्रपर उल्लेखाबद्दल प्रोफेसर रामचंद्र कृष्ण लागू म्हणतात (१)" खरें म्हटले तर आत्मचरित्राची ही प्रथा कोणी नवीनच सुरू केली असें नव्हे. वेदकालापासून तो आजतागायत तिला कधीच खंड पडलेला नाही. "(एकं) तदैक्षत बहुस्यां प्रजायेय" (छांदोग्योपनिषद) या वाक्यातील लहानसा उद्गार म्हणजे त्या विश्वनियामक सत तत्वाचें म्हणजे ब्रह्माचें आत्मचरित्र होय."

या प्रमाणें आत्मचरित्रपर उल्लेख श्रीकृष्णाने भगवद्गीतेतही केलेला आहे. चवथ्या अध्यायातील पाचव्या श्लोकात म्हटलें आहे की :

(१) 'दादोबा पांडुरंग' लेखक दादोबा पांडुरंग. उत्तरार्ध 'चरित्र' संपादक व चरित्र लेखक अनंत काकबा प्रियोळकर याच ग्रंथातील आत्मचरित्रा संबंधी रा.कृ.लागू यांचा लेख.

" बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तवचार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ।। "

" हे अर्जुना ! तू आणि मी आतापर्यंत अनेक वेळा जन्माला आलों आहोत. ते सर्व जन्म तुला आठवत नाहीत, परंतु मला मात्र आठवतात."

तसेच याच अध्यायातील सातव्या श्लोकात म्हटलें आहे ...

" यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। "

" ज्या धर्माचें स्वरूप जेव्हा जेव्हा लोपतें आणि अधर्माचें प्रस्थ माजतें तेव्हा तेव्हा मी जन्म घेतों."

अशा तऱ्हेचे अनेक आत्मचरित्रपर उल्लेख श्रीकृष्णाने भगवत्गीतेंत केलेले आहेत.

**२**

**लीळा चरित्राचे लेखक**
**श्री चक्रधर स्वामीच**

संस्कृत प्रमाणेंच प्राचीन मराठी वाङ्मयातही आत्मचरित्रपर उल्लेख आहेत. मराठी भाषेतील गद्यरचनेबाबत डॉ. वि.पा.दांडेकर यांचें मत सर्वमान्य होण्यासारखें आहे. ते म्हणतात (१) "महानुभावीय वाङ्मय उपलब्ध होऊ लागल्यापासून मराठी गद्याची परंपरा थेट बाराव्या शतकापर्यंत मागे नेऊन पोहोचविता येते. आधुनिक भारतीय भाषांचा विचार केला असता मराठी गद्याइतकें प्राचीन व समृद्ध गद्य क्वचितच एखाद्या आर्योद्भव

---

(१) मराठी साहित्याची रूपरेषा' - डॉ. वि.पा.दांडेकर पृष्ठ १२

भाषेत असेल. या दृष्टीने पाहता मराठीभाषाभिमान्यांचें हृदय आनंदाने आणि अभिमानाने तुडुंब भरून जावें अशा योग्यतेचे 'लीळाचरित्र' व 'सूत्रपाठ' हे दोन ग्रंथ निःसंशय आहेत."

म्हणजे 'लीळाचरित्र' व 'सूत्रपाठ' हे महानुभाव पंथियांचे गद्यग्रंथ मराठीतील सर्वांत जुने ग्रंथ होत.

श्री चक्रधरस्वामी यांनी महानुभावपंथ स्थापन केला. श्री चक्रधर स्वामींनी आपलें चरित्र शिष्यांना सांगितलें आणि शिष्यांनी तें लिहून काढलें. अशा तऱ्हेने तयार झालेला ग्रंथ म्हणजेच लीळाचरित्र होय. यास्तव लीळाचरित्र ग्रंथाचें कर्तृत्व श्री चक्रधरस्वामींचेंच समजावें हें मत बहुसंख्य विद्वानांना मान्य आहे. या बाबत डॉ. विष्णु भिकाजी कोलते म्हणतात (१)"लीळा चरित्राच्या निर्मितीचा इतिहास नीट लक्षांत आणला तर असें दिसून येईल की चक्रधरांनी प्रसंगोपात्त श्रीकृष्ण, श्री दत्तात्रेय, श्री चक्रपाणी व श्रीप्रभु यांच्या ज्या लीळा भक्तांना सांगितल्या होत्या त्यांचें नागदेवाचार्य हे स्मरण व मनन करीत असत. चक्रधरस्वामींच्या लीळाबरोबरच या अवतारांच्या लीळाही नागदेवांनी सांगितल्या व म्हाइंभटाने लिहून घेतल्या. चक्रधरांनी सांगितलेल्या लीळापैकी चक्रपाणी व गोविंद प्रभु यांच्या किरकोळ लीळा 'लीळा चरित्रांतच' विखुरलेल्या आहेत. पण श्रीकृष्ण व श्री दत्तात्रेय यांच्या अनुक्रमे ४६ व ४७ लीळा मात्र स्वतंत्रपणे लिहिलेल्या असून त्यांनाच श्रीकृष्णचरित्र व श्रीदत्तात्रेय चरित्र अशीं नांवें आहेत. चक्रधरांनी ज्या शब्दांत या लीळा भक्तांना सांगितल्या त्याच शब्दांत नागदेवांनी त्या म्हाइंभटाला सांगितल्या व त्याने त्या लिहून घेतल्या. असें असल्यामुळे या दोन्ही चरित्रग्रंथांचें कर्तृत्व चक्रधरांनाच दिलें पाहिजे. या प्रमाणेंच लीळा चरित्रांतील एकाक भागाचेंही कर्तृत्व चक्रधरांचें ठरतें. चक्रधरांच्या

(१) श्री चक्रधर चरित्र - डॉ. वि.भि. कोलते पृष्ठ २१२

आयुष्यातील एकांक भाग म्हणजे गुजराथेतील भवासचा वृत्तान्त व तेथून अचलपूरच्या मार्गाने रिद्धपूरला आल्यापासून तो प्रतिष्ठान येथे बाईसाची भेट होईपर्यंतचा काळ. या काळात आपल्या आयुष्या संबंधीच्या लीळा खुद्द चक्रधरांनीच भक्तांना सांगितल्या होत्या. त्याच नागदेवांनी म्हाईंभटाला सांगितल्या व त्याने त्या लिहिल्या. अर्थात याही लीळांचे कर्तृत्व चक्रधरांचे ठरते. या सर्व ग्रंथाचा मूळ मजकूर चक्रधरांनी निवेदन केलेला आहे आणि म्हणून त्याचें कर्तृत्व चक्रधरांकडे दिलें पाहिजे.

'लीळा चरित्र' हें श्री चक्रधर स्वामींचें आत्मचरित्रच होय असा अभिप्राय श्री हरि नारायण नेने यांनी ही व्यक्त केलेला आहे. ते म्हणतात (१)" एकांक म्हणजे श्री चक्रधरांचें एक प्रकारचें "आत्मचरित्र" आहे. शिष्यांना कथन केलेल्या व नंतर शिष्यांनी म्हाईंभटांना कथन केलेल्या आख्यायिकांच्या स्वरूपाने तें आपणा समोर प्राचीन मराठी गद्यात आहे. या गद्याचें स्वरूप साधें व सहजमनोहर आहे. त्यांत कृत्रिमता व क्लिष्टता तिळमात्र नाही. सांगणाराला कोठे क्लेश किंवा अडचण पडली असें मुळीच भासत नाही . या लहान सरितेचा प्रवाह मंद नसला तरी एकसारखा वहात आहे. त्याचें पाणी अगदी प्रसन्न, शांत व निर्मळ आहे. लहान मूल जरा चालू लागून, दुडदुडपणाने धावू लागलें म्हणजे साहजिकपणें पाहाणाऱ्याचे डोळे आपल्याकडे वेधून घेतें, त्याप्रमाणें मराठीच्या या बालमूर्तीचें नर्तन आनंददायक व मोहक आहे. वाक्यें किती सुटसुटीत व लहान लहान."

नमुना म्हणून पुढील दोन तीन उतारे पहा.

१

गोपाळचौंडी गोपाळ लपविणें.

(१) 'लीळा चरित्र' भाग १ ला एकांक. आवृत्ति दुसरी. शके १८७२ संपादक .. श्री हरि नारायण नेने .. उपोद्घात पृष्ठ ४१

(१) " गावीं एकी वीहीरीसि आसन: तेथ: गोपाळ आले : एऱ्हए आपुल्या वाहाणा फेडि: पांगुरण ठेवी : उदकामध्यें रिगे: तो अदृश्य होए: आणिकू ए: तोही अदृश्य होए: ऐसे आवघे अदृश्य जाले: गोऱ्हवें आपणालेया गेली : गावींचीं माणुसें आलीं, तवं तेहीं गोपाळाचेया पांगुरणाचे पुंजे देखीले: मग: एथ असति: आपुलालेयाचीं नांवें घेउनि बोलावा: मग ते नावें घेवों घेवों बोलावीति: सांगेया म्हणति आणि तो उदकांतुनि निगे : आपुलें पांगुरण घे: वाहाणा ले: मग: जाय: आणि - कातें बोलावीति: तेही तैसेंचि नीगति: लपविले होते ते आवघेही निगाले: तेथ: महदाइसीं पूसीलें: हाजी: तें कें होते: सर्वैं म्हणीतलें: अवकाळा एकीं धरिले होते || २४ ||"

. २ .

## एका गोवायाचा ज्वर घेणें.

(पृष्ट २६, २७) " एकी गावी म्हातारी एकीचा पुत गोऱ्हवे राखे: तेंसीं गोसावीयासि पाहु प्रधान आति: तीए गावीं गोसावीयासि वृक्षा खालि आसन: ऐसा त्यासि ज्वर आला: त्याचीया माता म्हणीतलें : जी जी: तेयासि ज्वर आला: आतां गोऱ्हवें आणिकासि नीरोवीति: आम्ही मेलों: गोसावी तेयाचीया घरा बीजें केलें: तेयाचें पांगरूनि तेया सरिसा पहुड: तेयासि समाधान जालें: तो गोऱ्हवासरिया पाठविला: तेयाची माए गोसावीयासि पथ्य करी: केतुलेया एका दीसा: गोसावी समाधान स्वीकारीलें मग: त्यें : गोसावीया नीगों नेदीति: सर्वैं: म्हणीतलें: हें त्यासि मांडौनि निगालें: हे गोष्टि मुतानंदाप्रति सांघितली || २५ || "

(१) 'लीळा चरित्र' भाग १ ला एकांक आवृत्ति दुसरी, शके १८७२ संपादक - श्री. हरि नारायण नेने ,, पृष्ट २६

## ३ तिवाडी मार्येला घागर उचलण्यास मदत करणें.

(पृष्ट ४५) " माकेडि वीहीरिसि आसनः तेथ बाइ एकी पाण्यिा आली: त्या म्हणीतलें: हा बाबा मरि घागरिसि हातु लावा कां: गोसावी श्रीकरु लावीला: यापरी साती हेळीं श्रीकरु लाववीला: वीळीचा वेळीं तीयेचा भातारु तेथ सेव्या करु आला: तेणें गोसावी यातें देखीलें: श्रीचरणा लागला: मग तो घरासि घेउनि आला: गोसावीयासी आसन केलें: मग ब्राम्हणीतें म्हणीतलें: ए: गोसावीयांचेया श्री चरणी लाग: ते श्रीचरणा लागली: मग तीयां म्हणीतलें: एयां गोसावीयां करवीं म्यां साती हेळीं श्रीकरु कैसा लाविला: तेणें म्हणीतलें चांडाळी पापीणी: गोसावीयां करवि करु कैसा लाववीला: गोसावी यांचेया श्रीचरणा लाग: मग तेणें चरणक्षाळण केलें: वीनविलें: मग गोसावी तेयांनि वीजें केलें ।। ६८।। "

## ४ मग लोकासि वीस्मयो जाला.

( पृष्ट ४६ ) " एकु वेळ एरीं हाटवटीया वीजें करीत असतिः तवं म्हैसे दोनि जूंझत असति: तडुवीया तडवी पडली असे: माणुसें माळवीया वरुनि पाहातें असति: गोसावीया वीजें करितां लोकें वारीलें: देव हो: न वचा: पुढीं म्हैसे जूंझत असति: गोसावी वीजें केलें: दोहीचि धडक मीळौनि वोसरले होते: गोसावी दोहीतें अवलोकौनि दोहीमध्यें वीजें केलें: मग दोहीचा रोखु नीवर्तला: एकू ऐसा नीगाला: एकू ऐसा नीगाला: मग लोकासि वीस्मयो जाला ।। ७०।। "

१

## दोन सन्याश्यांतील वाद, स्थित्यानंद न्यां

(पृष्ट २६) " गावीं एकी संन्यासी दीग्वीजयो करीतु आला: गावींचेया सैन्यासीयासीं उघाणी केली: गावींचेनि सैन्यासीयें हारवीलें: तेयाचें मठापत्यें: पुस्तक:भांडार:तेयासि जालें: मळा: वाडु: वृत्ति हे अवघे तेयासि जालें. मग: गावीचेनि सैन्यासीए गोसावीयां तें वीनवीलें: जो जो: मठापत्यें गेलें: पुस्तक भांडार गेलें: ऐसें दुख करीत सांघीतलें: गोसावी दोघांई उघाणी लावीली: पुढती गावींचेया सैन्यासीयातें एरें नीरोत्तर केलें: सर्वीं म्हणीतलें ऐसें हे म्हणत असति की: इतुलेनि तेयांसि अपुर्व स्फुरे: पुढतीं तीहीं नीरोत्तर केलें: तवं सर्वीं म्हणीतलें : ऐसें हें म्हणत असति की: इतुलेनि तेयांसि अपुर्व स्फुरे: ऐसेनि गावींचा सैन्यासी एरु जींतला: मग तेयाचें मठापत्य पुस्तक: भांडार: तेयाचें तेयासि जालें: मग तेही सैन्यासी गोसावीयासि आपुला वांटा संपादीला: गोसावीयासि आरोगण देति: गोसावीया वीजें करुं नेदीति: मग: गोसावी तेयासीं भांडौनि वीजें केलें: तथा: रुसौनि ॥ १२॥ "

****

## २ संत ज्ञानेश्वराचा आत्मपर उल्लेख.

संत ज्ञानेश्वराचें नांव माहीत नाही असा मनुष्य सापडणें विरळा. परंतु त्यांनी त्यांच्या चरित्रासंबंधी फारच थोडें लिहिलेलें आहे. ज्ञानेश्वरींतून (१) आलेले थोडेसे आत्मपर उल्लेख पुढे दिले आहेत. पहिल्या तीन उताऱ्या-वरून ज्ञानेश्वराची नम्रता दिसून येते आणि शेवटल्या उताऱ्या वरून औदार्य आणि समभाव व्यक्त होतो.

### १ तुम्ही बोलविल्या मी बोलेन.

" परी एथ असे एकु आधारु ।
तेणेंचि बोलें मी सधरु ।
जे सानुकूल श्रीगुरु ।
ज्ञानदेवो म्हणे ।। ७५ ।।
येऱ्हवीं तरी मी मुग्धु ।
जरी जाहला अविवेकु ।
तरी संतकृपादीपु ।
सोज्वळु असे ।। ७६ ।।

---

(१) सार्थ ज्ञानेश्वरी संपादक .. शंकर वामन दांडेकर
शके १८७४ सन १९५२

ज्याते कामधेनु माये ।
तयासी अप्राप्य कांहीं आहे ।
म्हणऊनि मी प्रवर्तो लाहें ।
ग्रंथीं इये ॥ ७९ ॥

तरी न्यून ते पुरतें ।
अधिक ते सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें ।
विनवितु असें ॥ ८० ॥

आतां देइजो अवधान ।
तुम्हीं बोलविल्या मी बोलेन ।
जैसें चेष्टे सूत्राधीन ।
दारु यंत्र ॥ ८१ ॥

तैसा मी अनुग्रहीतु ।
साधूंचा निरूपितु ।
ते आपुला अलंकारितु ।
भलतयापरी ॥ ८२ ॥ "

पृष्ट १२ अध्याय पहिला.

२ — रोपें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ॥

ज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना उद्देशून म्हणतात ...

" प्रभु तुम्ही महेशाचिया मूर्ती ।
आणि मी दुबळा अर्चितसें भक्ती ।
म्हणोनि केल जरी गंगावती ।
तरी स्वीकाराल की ॥ १४ ॥
बाळक बापाचिये ताटीं रिगे ।
रिगोनि बापातेंच जेवऊं लागे ।
की तो संतोषलेनि वेगें ।
मुखचि वोडवी ॥ १५ ॥
तैसा मी जरी तुम्हांप्रती ।
चावटी करीतसें बाळमती ।
तरी तुम्हीं तोषिजे ऐसी जाती ।
प्रेमाची या ॥ १६ ॥
आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें ।
तुम्हीं संत घेतले असा आहुवे ।
म्हणोनि केलिये सलगीचा नोहे ।
आभारु तुम्हां ॥ १७ ॥
अहो तान्ह्याची लागे झटे ।
तरी अधिकचि पान्हा फुटे ।
रोषें प्रेम दुणवटे ।
पढियंतयाचेनि ॥ १८ ॥

म्हणऊनि मज लेंकुरवाचेनि बोलें ।
तुमचें कृपाळूपण निदैलें ।
तें चेइलें हें मी जाणवलें ।
या लागीं बोलिलों मी ॥१९॥

पृष्ट २२४ आणि २२६ अध्याय नववा.

: २ : केलें असें श्रीमंतें । श्री गुरुरायें ॥

" म्हणोनि अशा सुभेदीं । (सुभेदीं)
उपमा श्लोक कोंदा कोंदीं ।
झाडा देईन प्रतिपदीं ।
ग्रंथार्थासी ॥ ११६३ ॥
हा ठावोवरी मातें ।
पुरविला सारस्वतें ।
केलें असें श्रीमंतें ।
श्री गुरुरायें ॥ ११६४ ॥
तेणें जी कृपासावायें ।
मी बोलें ते तुळें सामाये ।
आणि तुमच्ये सभे लाहें ।
गीता म्हणों ॥ ११६५ ॥

वरि तुम्हां संतांचे पाये ।
आजि मी पातला आहें ।
म्हणोनि जी नोहे ।
अटकु कांही ॥ ११६६ ॥

प्रभु कल्पद्रुमाचे तळवटीं ।
उदके ही लोटी ।
... ।
लक्ष्मीयेसी ॥ ११६७॥

तैसी तुम्हां संतांपासीं ।
अज्ञानाची गोठी कायसी ।
या लागीं नवरसीं ।
वानीन मी ॥ ११६८ ॥

किंबहुना आतां देवा ।
अवसरु मज देयावा ।
ज्ञानदेव म्हणे अवधारा ।
सांगेन ग्रंथु ॥ ११६९ ॥

.. पृष्ठ ४९८ अध्याय तेरावा.

४ आतां विश्वात्मकें देवें

" म्हणोनि तुम्हीं मजसेतीं ।
ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं ।

उपयोग केला तो पुढती ।
निरूपम जी ॥ १७९१ ॥

किंबहुना तुमचें केलें ।
धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें ।
येथ माझें जी उरलें ।
पाईकपण ॥ १७९२ ॥

आता विश्वात्मकें देवें ।
येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें ।
पसायदान हें ॥ १७९३ ॥

दुरिताचें तिमिर जावो ।
विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो ।
प्राणिजात ॥ १७९४ ॥

तमे गीतेचा कलशु ।
संपूर्ण हा अठरा दशु ।
म्हणे निवृत्तिदासु ।
ज्ञानदेवो ॥ १८०८ ॥

... पृष्ठ ८२४ आणि ८२६ अध्याय अठरावा

(२)

## संत नामदेव महाराज

संत नामदेव महाराजांचे काही अभंग आत्मचरित्रपर आहेत. त्यातील काही पुढे दिले आहेत. त्यावरून नामदेवांची पांडुरंग चरणीं दृढश्रद्धा आणि गुरुच्या विषयी आदर दिसून येतो.

(१)

### माझें हृदयीं नारायण

(१) " गोणाई म्हणे नाम्या सोडी देवपिसें ।
कुडविली कैसें घर वेडें ॥

शिवण्या टिपण्या घातलेसें पाणी ।
न पाहसी परतोनी घराकडे ॥

कैसी भक्ती लोकांवेगळी ।
संसाराची होळी केली नाम्या ॥

अन्नेसी उपवासी बैसलासी येथे ।
काय देईल तूतें विठ्ठल हा ॥ "

\+ + + +

" आम्हीं कीर्तन कुळवाडी ।
आणिक नाही उदीम जोडी ॥
वाचा पिकली पिकली ।
हरिनामाची वरो आली ॥

---

(१) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला ... ल.रा.पांगारकर.

एकादशीचे दिवशीं ।
जाल्या कैवल्याच्या राशी ॥
आजि आतवा संतांचें ।
जेवण जेऊं हरिनामाचें ॥
आम्ही जेवलों जेवलों ।
नामामृतें पूर्ण धालों ॥
नामा केसवाचा म्हणे ।
माझें हृदयीं नारायण ॥ "

२

## हेंचि मज घडो जन्मजन्मांतरीं.

" पंढरीचा वास चंद्रभागे स्नान ।
आणिक दर्शन विठोबाचें ॥
हेंचि मज घडो जन्मजन्मांतरीं ।
मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥
मुखीं नाम सदा संतांचें दरुशन ।
जनीं जनार्दन ऐसा भाव ॥
नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारीं ।
कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥ "

* * * * *

२

## नामा म्हणे स्वामी खेचर माउली.

" सुखाचा सुखतरु सद्गुरु खेचर ।

स्वरूप साक्षात्कार दाखवीला ॥

सांडोनी मीपण सद्गुरुच्या चरणा ।

लागलों संपूर्ण भावार्थेसी ॥

नामा म्हणे निकी सांपडली सोय ।

न विसंबे पाय खेचराचे ॥

नामा म्हणे माझी खेचर माऊली ।

तिणें दाखविली वाट मज ॥

सद्गुरुचे पाय जिवें न विसंबावे ।

मन वळवावे वृत्तीसहित ॥ १ ॥

डोळियाचे डोळे उघडिले जेणें ।

आनंदाचें लेणें लेवविलें ॥ २ ॥

जन्ममरणाचें फेडिलें सांकडें ।

कैवल्यचि पुढें दाखविलें ॥ ३ ॥

मोहरले तरु पुष्पफळभारें ।

तेचि निराकारें सनकादिक ॥ ४ ॥

नामा म्हणे स्वामी खेचर माउली ।

कृपेची साउली केली मज ॥ ५ ॥ "

* * *

४

## संत एकनाथ महाराज.

संत एकनाथ महाराजांची श्रीगुरुंच्या चरणीं म्हणजे जनार्दन स्वामींच्या ठिकाणी मोठी भक्ति होती. पुढील अभंग थोडेसे आत्मपर असून त्यावरून त्यांचा नम्रभाव प्रत्ययास येतो.

१

### गुरु माता गुरु पिता.

(१)" गुरु माता गुरु पिता। गुरु आमची कुळदेवता ॥१॥
थोर पडता सांकडें । गुरु रक्षी मागे पुढे ॥२॥
काया वाचा आणि मन। गुरु चरणींच अर्पण ॥३॥
एका जनार्दनीं शरण । गुरु एक जनार्दन ॥४॥"

२

### दत्तात्रयें माझें मन

दत्त सबाह्य अंतरीं । दत्तात्रेय चराचरीं ॥
दत्तात्रयें माझें मन । हरोनि नेलें मी तूं पण ॥
मूळ सिंहाद्री पर्वतीं । दत्तात्रयें केली वस्ती ॥
भक्ता मनीं केला वास। एका जनार्दनीं विश्वास॥

---

(१) श्री एकनाथ चरित्र ... ल. रा. पांगारकर.

२

## निंदक आमुचा गुरु

" निंदक कामाचा कामाचा ।

गडी आत्मारामाचा ।। ध्रु. ।।

निंदक आमुची काशी ।

आमुचीं पातकें अवघी नाशी ।। १ ।।

निंदक आमुची गंगा ।

आमुचीं पातकें नेते भंगा ।। २ ।।

निंदक आमुचा सखा ।

आमुचीं वस्त्रें धुतो फुका ।। ३ ।।

निंदक आमुचा गुरु ।

एका जनार्दनीं थोरु ।। ४ ।। "

*** *** ***

**१** संत तुकाराम महाराज.

संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांची गाथा हें त्यांचे आत्मचरित्रच होय. आपल्या अंतःकरणातले भाव व्यक्त करण्याचें त्यांचें कौशल्य अतुलनीय आहे. त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगांची संख्या इतकी मोठी आहे की कोणता घ्यावा नि कोणता घेऊ नये हें ठरणें मुष्कील व्हावें. त्यांची भाषा सरळ, सोपी आणि मोठी सोज्वळ अशी आहे. पुढील कांही अभंग पाहा.

**१** तुकाराम आपल्या बाळपणा विषयी म्हणतात.

" बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा ।
खेळता या पोरा नानामतें ॥ १ ॥
विटू दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडी ।
चंपे पेंड खडी एकी बेकी ॥ २ ॥
हमामा हुंबरी पकव्याच्या बारे ।
खेळे जंगी भोवरे चुवा चुवी ॥ ३ ॥
सेलडेरा आणि निसर भोंवडी ।
उचली बोले घोंडी अगळडें ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐसें बाळपण गेलें ।
मग तारुण्य आलें गर्व मूळ ॥ ५ ॥"

(१) श्री तुकारामाचें चरित्र पूर्वार्ध .. पुरुषोत्तम मंगेश लाड.

२

## दुष्काळ पडला आणि दिवाळें निघालें तेव्हां.

" सुखें होतों कोठें घेतली सुती ।
बांधिला गळा आपुले हातीं ॥ १ ॥
काय करूं बहु गुंतलों आतां ।
नये सरतां मागें पुढें ॥ २ ॥
होतें गांठीं तें सरलें आतां ।
आणीक माथीं ऋण जालें ॥ ३ ॥
सोंकरि लियाविण गमाविलें पीक ।
रांडा पोरें भिके लाविलीं ॥ ४ ॥
बहुतांचीं बहु घेतलीं घरें ।
न पडे पुरें कांहीं केल्या ॥ ५ ॥
तुका म्हणे कांहीं न धरावी आस ।
जावें हें सर्वस्व टाकोनीया ॥ ६ ॥ "

३

## भक्ती नारायण नुपेक्षी सर्वथा

संतांनी तुकोबास विचारलें कीं तुम्हांस वैराग्य कसें प्राप्त झालें ?

तेव्हां तुकोबा सांगतात ....

" यातीं शूद्र वैश्य केला वेवसाय ।
आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥

नये बोलों परी पाळिलें वचन ।
केलियाचा प्रश्न तुम्हीं संतीं ॥ २ ॥

संवसारें जालों अति दुःखें दुःखी ।
मायबाप सेखीं क्रमलिया ॥ ३ ॥

दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान ।
स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ॥ ४ ॥

लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें ।
वेवसाय देखें तुटी येता ॥ ५ ॥

देवाचें देऊळ होतें तें भंगलें ।
चित्तासी जें आलें करावेसें ॥ ६ ॥

आरंभीं कीर्तन करी एकादशी ।
नव्हतें अभ्यासी चित्त आधीं ॥ ७ ॥

काहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें ।
विश्वासें आदरें करोनिया ॥ ८ ॥

गाती पुढे त्यांचें धरावें धृपद ।
भावें चित्त शुद्ध करोनिया ॥ ९ ॥

संतांचें सेविलें तीर्थ पायवणी ।
लाज नाही मनीं येऊं दिली ॥ १० ॥

टाकला तो काही केला उपकार ।
केलें हें शरीर कष्टवूनि ॥ ११ ॥

वचन मानिलें नाहीं सुहृदाचें ।
समूळ प्रपंचें वीट आला ॥ १२ ॥
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही ।
मानियेलें नाहीं बहुमत ॥ १३ ॥
मानियेला स्वामी गुरुचा उपदेश ।
धरिला विश्वास दृढ नामीं ॥१४ ॥
यावरी या झाली कवित्वाची स्फूर्ति ।
पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥१५॥
निषेधाचा काही पडिला आघात ।
तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १६॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें ।
केलें नारायणें समाधान ॥ १७॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार ।
होईल उशीर आता पुरे ॥१८॥
आता आहे तैसा दिसतो विचार ।
पुढील प्रकार देव जाणे ॥१९॥
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा ।
कृपावंत ऐसा कळों आलें ॥२०॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल ।
बोलविले बोल पांडुरंगें ॥२१॥

४

## विठोबा भेटला निराकार.

तुकोबांना विठोबाचें दर्शन झालें असतांना त्यांची स्थिति पुढील प्रमाणें झाली होती.

" पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार जाला ।
विठोबा भेटला निराकार ॥
भांबगिरि पाठारीं वस्ती जाण केली ।
वृत्ति स्थिरावली परब्रह्मीं ॥
निर्वाण जाणोनि आसन घातलें ।
ध्यान आरंभिलें देवाजीचें ॥
सर्प विंचु व्याघ्र आंगासी झोंबले ।
पीडूं ते लागले सकळीक ॥
दीपकीं कर्पूर कैसा तो विराला ।
तैसा देह जाला तुका म्हणे ॥ "

५

## नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें

नामदेव महाराज यांनीं तुकोबांना स्वप्नांत दर्शन दिलें, त्यावेळीं तुकोबा म्हणतात ...

" नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें ।
सवें पांडुरंगें येऊनियां ॥

सांगितलें काम करावें कवित्व ।
वाउगें निमित्य बोलों नको ॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें ।
थापटोनि केलें सावधान ॥
प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी ।
उरले ते शेवटी लावी तुका ॥ "

६

रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी

तुकोबा म्हणतात की गुरुकृपेचा आधार आहे म्हणूनच मला पांडुरंग भेटला.

" नेणें अर्थ काही नव्हती माझे बोल ।
किनवितों कोपाल संत झणी ॥१॥
नव्हती माझे बोल बोले पांडुरंग ।
असे अंग संगें व्यापूनियां ॥२॥
मज मूढा शक्ति कैंचा हा विचार ।
निगमादिकां पार बोलावया ॥३॥
रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी ।
ओंवळ्या उत्तरीं हेंचि ध्यान ॥४॥
तुका म्हणे गुरुकृपेचा आधार ।
पांडुरंगे भार घेतला माझा ॥५॥ "

\+ + +

## ७

## विठ्ठलाने शिवाजीचें रूप घेतलें.

(१)" शके १५५८ च्या श्रावण महिन्यांत म्हणजे इ.स. १६३६ च्या जुलै, ऑगस्ट महिन्यांत तुकोबांची कीर्तनें लोहगावास चाललीं होतीं. त्यावेळीं मोंगलांचा सरदार खानजमान हा सैन्य घेऊन इंद्रायणी नदीपासून दक्षिणेस तीन मैलावर व पुण्याचे ईशान्येस दहा मैलावर असलेल्या (अ) लोहगांवीं श्रावण महिन्यांत येऊन थडकला. तुकाराम महाराजांच्या कीर्तनांत शिवाजी महाराज आहेत हें समजताच पठाणांनी कीर्तन चालू असलेल्या ठिकाणास वेढा घातला. पण शिवाजी कोणता हें ठाऊक नसल्याने कोणास पकडावें हें त्यांना कळेना. तेव्हां सेनापतीने हुकुम दिला की कीर्तनांत असलेल्या सर्वांची कत्तल करा, म्हणजे त्यांत शिवाजीही सांपडेल. यावेळीं तुकोबांनी पांडुरंगाचा धावा केला. तेव्हां विठोबाने शिवाजीचें रूप घेऊन घोड्यावर स्वार होऊन पठाणास हुलकावण्या दाखवीत रानांत नेऊन घातलें. इकडे कीर्तन निर्विघ्नपार पडून शिवाजीराजे परत जात असतां हा आश्चर्यकारक वृत्तांत त्यांना समजला."

ते चार अभंग पुढील प्रमाणें आहेत.

(१) " न देखवे डोळा ऐसा हा आकांत ॥
परपीडे चित्त दुःखी होतें ॥१॥
काय तुम्ही येथें नसालसे जालें ॥
आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥२॥

---

(१) श्री तुकारामाचें चरित्र .. पुरुषोत्तम मंगेश लाड पृष्ठ १२२ ते १२६.

(अ) Aurangzeb - Jadunath Sarkar - Vol.I Page 47 Foot Note.

परचक्र कोठें हरिदासांच्या वासें ।
न देखिजेत देशें राहातिया ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी लाजविली सेवा ।
हीनपणें देवा जिणें जालें ॥ ४ ॥ "

(२) " काय ज्यां मानावें हरिकथेचें फळ ॥
तरिजे सकळ जनीं ऐसें ॥ १ ॥
उच्छेद तो असे हा गे आरंभला ॥
रोकडें विठ्ठला परचक्र ॥ २ ॥
पापाविण नाहीं पाप येत पुढें ॥
साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥ ३ ॥
तुका म्हणे जेथें वसतील दास ।
तेथें तुझा वास कैसा आता ॥ ४ ॥ "

( ३ ) " भीत नाहीं आता आपुल्या मरणा ॥
दुःखी होता जना न देखवे ॥ १ ॥
आमची तो जाती ऐसी परंपरा ॥
की तुम्ही दातारा नेणां ऐसें ॥ २ ॥
भजनीं विक्षेप तें चि मज मरण ।
न वजाया क्षण एक वायां ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा ॥
ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥ ४ ॥ "

(४) " बोलिलों तें आतां पाळावें वचन ॥

ऐसें पुण्य कोण माझे गाठीं ॥१॥

जातों आतां आज्ञा घेऊनिया स्वामी ॥

काळक्षेप आम्ही करूं कोठे ॥२॥

न घडे यावरि न धरवे धीर ॥

पीडतो राष्ट्र देखोनि जग ॥३॥

तुका म्हणे तुम्ही दिसे मोकलिलें ।

काय आतां आलें जीवित्वाचें ॥४॥ "

** ** **

६ संत बहिणाबाई.

तुकोबांची अभंगवाणी ऐकून आपणास त्यांचें दर्शन स्वप्नांत तरी व्हावें असा निदिध्यास बहिणाबाईंना लागला, म्हणून त्या म्हणतात ...

(१) " न बोलवे शब्द अंतरीचा धावा ।
नाइके तुकोबा काय कीजे ।।
अदृष्ट करंटे साह्य नव्हे देव ।
अंतरींची हाव काय करूं ।।
तेरा दिवस ज्याने वह्या उदकांत
घालुनिया सत्य वाचविल्या ।।
महाराष्ट्र शब्दांत वेदांतीचे अर्थ ।
बोलिला लोकांत सर्व द्रष्टा ।।
अंतर साक्ष आहे निरूपणीं हेत ।
जडे परी चित्त ओळखेना ।।
बहेणि म्हणे मीच असेन अपराधी ।
अन्याय त्रिशुध्दि काय त्याचा ।। "

१ आनंदलें मन चिद्रूप कोंदलें.

पुढे तुकाराम महाराजांनी स्वप्नांत दर्शन देऊन बहिणाबाईस आशीर्वाद दिला. तेव्हा बहिणाबाईंना जो आनंद झाला तो त्यांच्याच शब्दांत सांगितलेला बरा ..

(१) महाराष्ट्र कविचरित्र ,,भाग ६ वा, इ.स.१९२४
.. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.

बहुत अंतरीं शोक आरंभिला ।

की मज विठ्ठला मोकलिलें ।।

त्रिविध तापानें तापलें मी बहु ।

जाईना का जीऊं प्राण माझा ।।

तंव अकस्मात सातविया दिनीं ।

नामसंकीर्तनीं योगयुक्त ।।

तुकाराम रूपें येऊनि प्रत्यक्ष ।

म्हणे पूर्वपक्ष सांभाळिले ।।

नको करूं चिंता आहे मी तुजपाशीं ।

घेई अमृतासी हातीं चिया ।।

गाय केलें वत्स मुखीं निघे धार ।

अमृत हें सार सेवी हेंची ।।

ठेऊनिया कर मस्तकीं बोलिला ।

मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ।।

त्याहीं पायावरी ठेविलें मस्तक ।

दिधलें पुस्तक मंत्र गीता ।।

कार्तिकात वद्य पंचमी रविवार ।

स्वामींचा विचार गुरुकृपा ।।

आनंदलें मन चिद्रूप कोंदलें ।

उठोनि बैसलें चमत्कारें ।।

मैत्र आठवती तुकोबा स्वरूपें ।

स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली ।। "

२

## आनंदली सृष्टी अंतरंगें.

तुकोबांच्या स्वप्नांतील दर्शनामुळे जरी बहिणाबाईंना आनंद झाला तरी तुकोबांचे प्रत्यक्ष दर्शन व्हावें असा बहिणाबाईंनी ध्यास धरला. आणि भ्रतारासहित देहून जावें असें त्यांनीं बोलून दाखविलें. प्रथम बहिणाबाईंच्या भ्रताराची तशी इच्छा नव्हती परंतु पुढे झाली. तेव्हां त्या म्हणतात ...

" तुकोबाचें गांवीं जाऊनीच राहों ।

मनींचा दृढावो धरूनियां ।।

ऐसी पालटली भ्रताराची बुद्धि ।

स्वामी कृपानिधी अंतरसाक्ष ।।

काय एक देव करील तें नव्हे ।

प्रत्यक्ष अनुभव सर्व जनां ।। "

\+ \+ \+ \+

" माय बाप बंधु भ्रतारासहित

इंद्रायणी जेथ तेथ आलों

करूनियां स्नान पांडुरंगी भेटी ।

आनंदली सृष्टी अंतरंगे ।।

तुकोबा आरती करीत होते तेथे ।
नमस्कारें स्वस्थ चित्त केलें ॥
स्वप्नीं जो देखिला तें चि ध्यान तेथ ।
देखिलें नेमस्त पूर्ण दृष्टी ॥ "

\+ + + + +

" देवळीत कथा सर्व काळ होत ।
श्रवण करीत दिनरात्रीं ॥
तुकोबाची कथा वेदांतील अर्थ ।
पावें माझें चित्त समाधान ॥
तुकोबाचें ध्यान पूर्वी कोल्हापुरीं ।
जें स्वप्नामाझारीं देखीयेलें ॥
तेंचि ध्यान डोळा प्रत्यक्ष देखोनी ।
आनंद लोचनीं हेलावत ॥
दिनरात्रीं निद्रा नये तिळभरी ।
तुकोबा अंतरीं प्रवेशला ॥
बहेणी म्हणे येती सुखाचे डोलावे ।
जाणती अनुभवे जाणती ते ॥ "

** ** **

७

## -: श्री समर्थ रामदास स्वामी :-

१

### करुणाष्टकें

श्री समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक आत्म चरित्रपर आहेत. करुणाष्टकांतून रामदास स्वामींची मन:स्थिती व्यक्त झालेली आहे. त्या वरुन महत्कार्यासाठी ते आपलें मन कसें तयार करीत होतें हें दिसून येतें. तीं करुणाष्टकें पुढील प्रमाणें होत.

" अनुदिन अनुतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया ।
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धाव रे धाव आता ॥ १ ॥

---

(१) श्री समर्थ चरित्र - ज. र. आजगांवकर

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजन धनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ।
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कास तुझी धरावी ।। २ ।।

विषय जनित सुखें सौख्य होणार नाही
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांही
रघुकुळ टिळका रे हीत माझें करावें
दुरित दुरि हरावें स्वस्वरूपीं भरावें ।। ३ ।।

तनमनधन माझें राघवारूप तुझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ।
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळ भजन लीला लागली आस तुझी ।। ४ ।।

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना ।
घडिघडि बिघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणउनि करुणा हे बोलतो दीनवाचा ।।५।।

जळत हृदय माझें जन्म कोट्यानकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ।
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू ।
षड्रिपुकुळ माझें तोडि याचा विरोधु ।।६।।

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
सिणत सिणत पोटीं पाहिली वाट तुझी ।
झडकरि झड घाली धाव पंचाननारे
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ।।७।।

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आता चित्त कोठें न राहे ।
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म घेती ।।८।।

## समर्थांचे छत्रपति शिवाजी महाराजांना पत्र.

समर्थ रामदास स्वामींनीं श्री छत्रपति शिवाजी महाराजांना जें ओवीबद्ध पत्र पाठविलें त्यांत आत्मपर अगदी थोडासा उल्लेख आहे. तो पुढील प्रमाणें ....

(१)" तुमचे देशीं वास्तव्य केलें ।
परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंध विस्मरण जालें ।
काय नेणूं ।। १३।।
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति ।
सांगणें काय तुम्हां प्रती ।
धर्म स्थापनेची कीर्ति
सांभाळली पाहिजे ।। १४।।

---

(१) श्री समर्थ चरित्र - ज. र. आजगांवकर.

उद्दंड राजकारण टळें ।

तेणें वित्त विभागलें ।

प्रसंग नसता लिहिलें ।

क्षमा केली पाहिजे ॥७५॥

*** *** ***

## ८ निष्कर्ष

### १ चिकित्सक दृष्टीचा अभाव.

आतां पर्यंत संस्कृत आणि प्राचीन मराठी वाङ्मयातील आत्म वर्णनात्मक जें थोडें फार वर्णन आपण आताच पाहिलें त्याविषयीं दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे. आधुनिक भाषेंत ज्याला आपण आत्मचरित्र म्हणतों तसें ते नाहीं हें खरें आहे. परंतु प्राचीन मराठी वाङ्मयात आत्मचरित्रपर वर्णन नाहींच असेंही आपणास म्हणता येणार नाही, हेंही आपण आताच पाहिलें. उलट तुकाराम महाराजांनीं जसें आत्मचरित्र लिहिलें आहे तसें जगाच्या वाङ्मयांत सापडणें मुष्कीलीचें आहे.

एवढें मात्र खरें की प्राचीन वाङ्मयात चिकित्सक दृष्टीचा अभाव होता यांत शंका नाही. यामुळेंच आत्मचरित्रपर वर्णनांतही अतिशयोक्ति डोकावते. कारण कितीही तर्क केला तरी 'ज्ञानेश्वरांनी भिंत चालविली' हें वर्णन पटण्यासारखें नाहीं. परंतु यांतून ध्वनित होणारा जो अर्थ की ज्ञानेश्वरांनी चांगदेवाचा गर्वपरिहार केला हाच अर्थ घ्यावा म्हणजे झालें. अगदी हाच प्रश्न मी आचार्य विनोबा यांना विचारला होता आणि त्यांनीही वरील प्रमाणेंच मत व्यक्त केलें होतें. कारण स्वतः ज्ञानेश्वरांनी 'मी भिंत चालविली किंवा रेड्याकडून वेद म्हणविले' असें कोठेंही म्हटलेलें नाही. अशा तऱ्हेनें अतिशयोक्तीचा भाग वगळला तर प्राचीन वाङ्मयांतही थोडेसे का होईनात पण आत्मचरित्रपर उल्लेख आहेत हें कोणासही मान्य होण्यासारखें आहे.

++ ++ ++

२

## ज्ञानराज माऊली तुकाराम.

या संतांच्या आत्मचरित्रपर उल्लेखावरून त्यांच्या वाङ्मयाबद्दल महाराष्ट्रातील आबालवृद्धांना आपुलकी आणि ममत्व किती वाटते या विषयी थोडेसे बोललो तर अयोग्य होणार नाही. पंढरपूरच्या विठोबाचें दैवत या वारकरी पंथाच्या अध्वर्युंनी अगदी खेडयापाडयांतून पसरविलें आहे. आजही हजारो नव्हे लाखो लोक असे आहेत की मोठया भक्तिभावाने ते या संतांचे अभंग गातात आणि अंतःकरण पावन करून घेतात. आजही रात्री आठ नऊच्या सुमाराला " ज्ञानेश्वर माऊली ! ज्ञानराज माऊली तुकाराम !! " असा जयघोष टाळ मृदंगाच्या निनादात ऐकू येत नाही असें जवळ जवळ एकही खेडे असणार नाही. इतकी विठ्ठलाची आणि संतांची गोडी महाराष्ट्रातल्या खेडयापाड्यांतल्या लोकांना अजूनही वाटते. हेंच या संतांचें चालतें बोलतें स्मारक आहे. असे कितीतरी वारकरी आहेत की त्यांना लिहिता वाचता येत नाही परंतु संतांचे कांही अभंग त्यांना मुखोद्गत येत असतात आणि ते त्यांना मोठ्या प्रेमाने म्हणतात.

आजही लाखो लोक आषाढी आणि कार्तिकी एकादशीस पंढरपुरास जातात. आजही तेथें कीर्तनाची दाटी होते आणि आजही ' रामकृष्ण हरि ' या नामाच्या जयघोषाने पंढरी दुमदुमून जाते. म्हणजे संत चोखामेळा यांचा अभंग हा अक्षरशः आजही खरा ठरतो. ते म्हणतात ...

" विठ्ठल विठ्ठल गजरी ।
अवघी दुमदुमली पंढरी ।। १ ।।
होतो नामाचा गजर ।
दिंड्या पताकांचा भार ।। २ ।।
निवृत्ति ज्ञानदेव सोपान ।
अपार वैष्णव ते जन ।। ३ ।।
हरिकीर्तनाची दाटी ।
तेथे चोखा घाली मिठी ।। ४ ।। "

## ३ संतांनी दिलेली स्फूर्ति

या संतांच्या आत्मचरित्रपर वाङ्मयाचा जो थोडासा उल्लेख यापूर्वी केला त्याचें आणखी एक कारण आहे. तें असें कीं या संतांच्या अभंगांची गोडी केवळ अशिक्षित आणि खेड्यापाड्यांत राहणाऱ्या लोकांनाच वाटते असें नाहीं. पुढील प्रकरणांत आलेल्या आधुनिक आत्मचरित्रांच्या वर्णनावरून आपणास दिसून येईल की कितीतरी थोर पुरुषांच्या जीवनावर या संतांच्या वाङ्मयाचा सुपरिणाम झालेला आहे. या दृष्टीनें गुरुवर्य रामभाऊ रानडे यांचा येथे मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो.

आधुनिक आत्मचरित्रांच्या वर्णनावरून न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, धर्मानंद कोसंबी, संत वाङ्मयाचे उपासक लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या जीवनावर तुकाराम महाराजांच्या अभंगांचा बराच परिणाम झालेला आहे असें दिसून येते. प्रातः कालीं सुमारे चार साडे चार वाजतां उठून न्यायमूर्ति रानडे

नामदेव महाराजांचे व तुकाराम महाराजांचे अभंग मोठ्या भक्तीभावाने म्हणत असत असें रमाबाईंनी नमूद करून ठेवलें आहे. ते अभंग म्हणण्यांत न्यायमूर्ति इतके तल्लीन होऊन जात की कधी कधी त्यांचा कंठ दाटून येई आणि त्यांच्या डोळ्यावाटे अश्रू वाहू लागत. सांगायचा मुद्दा असा की संत वाङ्मयाचें सामर्थ्य सांगून सांगतां येण्यासारखें नाही. असो. आतां पुढील प्रकरणांत आपण आत्मचरित्राकडे वळू या.

** ** ** **